# रत्नागिरी शहरातील मुद्रणकलेचा उगम व विकास

**श्री. मंगेश प्रकाश चापडे**
ग्रंथालय सहाय्यक
मत्स्य महाविद्यालय
शिरगांव, रत्नागिरी

**सौ. मनिषा गोपाळ सावंत**
सहाय्यक ग्रंथपाल
मत्स्य महाविद्यालय
शिरगांव, रत्नागिरी

---

**सारांश:** रत्नागिरी शहर हे कोकणातील एक महत्त्वाचे शहर आहे. रत्नागिरी शहरामध्ये मिश्र स्वरूपाची लोकसंख्या आढळून येते. त्याचबरोबर फार पूर्वीपासून या शहराला साहित्याचा वारसा लाभला आहे. ''केसरी'' हे प्रसिध्द वर्तमानपत्र सुरू होण्यापूर्वी रत्नागिरी शहरातील कै. हरी नारायण लिमये (इ.स. १८४२ ते १९०६) यांनी इ.स. १८७१ मध्ये सुरू केलेले ''सत्यशोधक'' हे पहिले साप्ताहिक. मुद्रण कलेचा विकास आणि रत्नागिरी शहरातील मुद्रणालयांच्या विकास, तसेच त्यामध्ये होणारी स्थित्यंतरे यांचा अभ्यास प्रस्तुत लेखामध्ये करित आहे. यावरून असे दिसून येते की, भारतातील तसेच महाराष्ट्रातील मुद्रणकला, मुद्रणालये यांमध्ये जसे बदल घडून आले तसेच त्या क्षेत्राचा जसा विकास होत गेला तसाच रत्नागिरी शहरातील मुद्रणालये आणि प्रसिध्द होणाऱ्या साहित्य क्षेत्रातही बदल होत गेले.

(Keywords: मुद्रणकला, मुद्रणालये, रत्नागिरी, सत्यशोधक)

---

**प्रस्तावना:**

मुद्रणालये आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र यांचा निकटचा संबंध आहे. मुद्रण कलेचा प्रथम शोध सुमारे दिड ते दोन हजार वर्षापूर्वी चीनमध्ये झाला. त्या काळात लाकडावर बुध्दाची चित्रे कोरून व त्यांना शाई लावून त्यांचे कागदावर ठसे घेणे अशी पध्दत चीनमध्ये प्रचलित होती *(भारतीय संस्कृतीकोश भाग–७)*. चीनमध्ये मुद्रणकलेचा शोध लागला असला तरी आजच्या आधुनिक मुद्रण कलेचा उगम मात्र युरोप मध्ये झाला. जगातील मुद्रित साहित्याचा विचार केल्यास ''वेद'' हे सर्वात प्राचीन ग्रंथ आहेत. याची व्युत्पत्ती जरी भारतात झाली असली तरी मुद्रण कलेचा व साहित्य निर्मितीचा मान हा भारतीयांना न मिळता, तो चीनला व युरोपला मिळाला. दि. ११ मे ८६८ मध्ये 'हिरकसुत्र' नावाचा पहिला ग्रंथ छापला गेला. भारतामध्ये सन १५५७ मध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूने पोर्तुगीज लोकांनी मुद्रणतंत्र विकसित केले. महाराष्ट्रामध्ये १७व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी एक छापखाना उभारला होता. त्यानंतर इ.स. १८१२ पासून मुद्रण कलेच्या विकासाला खरा प्रारंभ झाला.

भारताबरोबर महाराष्ट्रात सुध्दा मुद्रणकलेचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. महाराष्ट्रातील मुंबई या ठिकाणी मुद्रणकलेचा विकास व मुद्रणकलेतील आधुनिकता मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येते. रत्नागिरी हे शहर मुंबईपासून जवळ असल्यामुळे रत्नागिरी शहरातही मुद्रणकलेचा विकास झाल्याचे दिसून येते. त्यामुळे

सत्यशोधक प्रेस, रत्नभुमी प्रेस यांसारख्या जुन्या मुद्रणालयांनी आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना त्यांच्या बरोबरीने अनेक नवीन मुद्रणालये देखील शहरात दाखल झाली.

**उद्दिष्टे:**

प्रस्तुत अभ्यासासाठी खालील उद्दिष्टे अंमलात आणली.

- रत्नागिरी शहरातील मुद्रणालयांच्या निर्मितीचा व वाटचालीचा अभ्यास करणे.
- मुद्रणालयातून प्रकाशित वा मुद्रित झालेल्या साहित्याचा आढावा घेणे.

**मुद्रणकला:**

कागदाचा शोध जसा प्रथम चीन मध्ये लागला तसाच मुद्रणकलेचा शोधही प्रथम चीन मध्येच लागला. जरी हा शोध चीन देशाने लावला असला तरी आजच्या आधुनिक मुद्रणकलेचा त्या चीनमधील कलेशी काही संबंध नाही. युरोपमध्ये लाकडी ठोकळे तयार करून चित्र छापायची कला इ.स. १३व्या व १४व्या शतकात प्रचलित होती. त्याला ठोकळा पध्दती मुद्रणकला असे म्हटले जायचे, परंतु या पध्दतीमध्ये मुद्रणात अडचणी निर्माण होवू लागल्यानंतर युरोपातील दोन माणसांनी आधुनिक खिळाछाप पध्दती मुद्रणकलेचा शोध लावून ही अडचण सोडवली. इ.स. १४४१ साली, कॉस्टर नावाच्या व्यक्तीने, ''आमच्या मुक्तीचा आदर्श'' हे खिळाछाप पध्दतीने मुद्रित केलेले पहिले पुस्तक आहे. इ.स. १४५० साली गटेनबर्ग यांनी मेंज या गावी पहिला छापखाना उभारला आणि इ.स. १४५६ साली १३०० पृष्ठाचा दोन भागात विभागलेला ''बायबल'' हा प्रचंड मोठा ग्रंथ छापला.

**भारतातील मुद्रणकलेचा इतिहास:**

कॉस्टर व गटेनबर्ग यांनी मुद्रण कलेचा शोध लावला त्यावेळी मुद्रणकला ही गुप्त विद्या म्हणून ओळखली जायची. परंतु इ.स.१४५० नंतरच्या २५ वर्षात सर्व युरोपभर व नंतर जगभर या कलेचा विकास व प्रसार झाला. मुद्रणकलेच्या शोधानंतर १०० वर्षांनी या कलेचा भारतात प्रवेश झाला. पोर्तुगीज लोकांनी आशिया व आफ्रिकेतील स्थानिक लोकांचे धर्मांतर करण्यासाठी बायबल व इतर ख्रिस्ती धर्माशी संबंधित ग्रंथांचा वापर करण्यास सुरूवात केली. परंतु ग्रंथाच्या प्रती कमी पडू लागल्यामुळे त्या छापण्यासाठी पोर्तुगालहून छापखाने मागविण्यात आले.

छापखाने घेवून येणारे जहाज हे, समुद्रात वादळ झाल्यामुळे इथोपियाकडे पाठविण्या ऐवजी गोव्याकडे वळविण्यात आले व दि. ६ सप्टेंबर १५५६ रोजी सेंट पॉल कॉलेज, गोवा इथे छापखान्याची ताबडतोब जुळवणी करून दि. १८ ऑक्टोबर १५५६ रोजी पहिले पत्रक छापण्यात आले. हे पत्रक म्हणजे भारतात छापलेले पहिले मुद्रित साहित्य होय. यानंतर या कलेमध्ये अनेक स्थित्यंतरे होत गेली. गोव्यातील छापखान्यानंतर १० वर्षांनी मुंबईच्या भीमजी पारेख या नावाच्या व्यक्तींने मुंबईमध्ये छापखाना सुरू केला. गोवा आणि मुंबई येथील छापखाने बंद पडल्यानंतर मद्रास मध्ये छापखाना उभारला गेल्याचे काही संदर्भ आढळून येतात. त्यानंतर बंगाल या ठिकाणी चार्ल्स विल्किन्स या गृहस्थाने छापखाना सुरू केला. भारतीय भाषेतील सुरूवातीची पुस्तके याच छापखान्यात छापली गेली.

इ.स. १७व्या शतकातील भीम पारेख यांचा छापखाना बंद पडल्यानंतर १०० वर्षांनी रूस्तम खरसेठजी या पारशी व्यक्तीने एक छापखाना सुरू करून इ.स.१७८० साली एक पंचांग आणि कॅलेडंर छापले असल्याचे संदर्भ दिसून येतात. महाराष्ट्रात सुरू झालेली मुद्रणकलेची ही सुरूवात होती.

**महाराष्ट्रातील मुद्रणकलेचा इतिहास:**

महाराष्ट्रात ''पंचोपाख्यान'' हे पहिले मराठी पुस्तक इ.स. १८२२ साली छापले गेले. त्यानंतर महाराष्ट्र भाषेचा कोश, सिंहासन बत्तीशी, विदूर निती अशी अनेक पुस्तके व मोठे ग्रंथ भराभर छापले गेले. इ.स. १८१२ नंतर छापखान्यांची संख्या वाढू लागली. 'गणपत कृष्णाजी' हा इ.स.१८३१ साली स्थापन झालेला त्यापैकीच एक छापखाना! मराठी मुद्रणाच्या दृष्टीने सर्वाधिक महत्व या छापखान्यालाच दिले जाते. हिंदू धर्म ग्रंथाचे मुद्रण करण्याचे काम 'गणपत कृष्णाजी' याच छापखान्याने केलेले आहे. हे सर्व ग्रंथ खिळाछाप पध्दतीने छापलेले असून यामधील फोटोग्राफीचे संशोधन करताना लिथोग्राफीचा शोध लागला आणि भारतात इ.स. १८२४ साली मुंबई सरकारने लिथोप्रेस सुरू केला.

इंग्लड मध्ये छापखान्याला प्रिंटिंग प्रेस या नावाने ओळखले जात होते. तेच नाव पुढे भारतातही प्रचलित झाले. परंतु छपाईच्या शाईत प्राण्यांच्या चरबीचा वापर केला जातो आणि लोकांना बाटविले जाते असा प्रवाद निर्माण झाल्यामुळे छपाईच्या कागदास कोणी हात लावण्यास तयार नव्हते. पण पुढे हे गैरसमज दूर होत गेले व मुद्रण व्यवसाय उदयास आला. पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र छापणारे, ऑफसेट प्रिंटिंग करणारे, शिळाछापाचे प्रिंटिंग करणारे असे अनेक प्रकार निर्माण झाले. मुंबईपासून कोकण जवळ असल्यामुळे कोकणातील रत्नागिरी शहरात मुद्रणकला व छापखान्यांची सुरूवात लवकरच झालेली दिसून येते. रत्नागिरीतील मुद्रणालयांचा अभ्यास करताना सर्व प्रथम रत्नागिरी शहराचा इतिहास जाणून घेणे गरजेचे आहे.

**रत्नागिरी शहराचा इतिहास:**

महाराष्ट्रातील कोकण हे सह्याद्री पर्वत आणि अरबीसमुद्र यांच्यामधील अरूंद पट्टी आहे. त्यामध्ये रत्नागिरी हे ाहर वसलेले आहे, त्यात प्रवेश केला तो काठेवाडच्या ब्राम्हणांनी, गलबताने हे लोक दक्षिणेत आले. प्रथम नालासोपारा, नंतर दाभोळ खाडीतून चिपळूण पर्यंत, नंतर गुहागर, जयगड, रत्नागिरी, राजापूर व विजयदुर्ग येथपर्यंतचा भूभाग त्यांनी हळूहळू स्वत:कडे घेतला. भगवान पर्शुरामाचे कोकण वसवणे हे पुराणातील एक रूपक आहे. ते या परिस्थितीचे बोलके उदाहरण आहे. सहा हजार वर्षापूर्वी रामायण काळात अगस्ती ऋषीही विंध्यपर्वत, नर्मदा, तापी ओलांडून दक्षिणेत असल्याच्या नोंदी आढळून येतात. काठेवाडच्या या चितपावन ब्राम्हणांनीच येथील जंगले तोडून येथे वस्ती स्थाने स्थापन केली.

शिशुभंग, मौर्य, शक, कुशान, गुप्त, हूळ, परिवर्तित रजपूत, मोगल, शिवाजी राजे, पेशवे यांचे या पट्ट्याकडे *(कोकणाकडे)* दुर्लक्षच झाले व पध्दतशीर शास्त्रशुध्द राजवट येथे त्यांनी कधी केलीच नाही. इंग्रजानी मात्र सन १८३५ ते १८९० या काळात शेतजमिनींची मोजणी केली व नागरी जीवनाचा पाया घातला. इ.स. १८१८ मध्ये पेशवाई खालसा झाल्यानंतर पुण्यामुंबईत जशी इ.स. १८३२ पासूनच वर्तमानपत्रे जनजागृतीसाठी काढण्यात येऊ लागली तशी वर्तमानपत्रे कोकणात निघण्याचा संबंध नव्हता. इ. स. १९०१ मध्ये रत्नागिरी

शहराची लोकसंख्या १६,०९४ होती. त्यात ब्राम्हण १०:, वाणी १०:, भंडारी २५:, कुणबी १०:, मुसलमान २५: व इतर ५: असे साधारण प्रमाण होते.

त्यात वर्तमानपत्रे घेणारे म्हणजे फक्त ब्राम्हण पण तेही बहुतांश भिक्षुकीवर जगणारे, येऊन—जाऊन शहरातील १५/२० वकील मंडळी, हाताच्या बोटावर मोजता येतील इतके डॉक्टर्स व काही प्रतिष्ठित लोक एवढ्यांचे जीवावर वर्तमानपत्र चालणार कसे, असा तेव्हा प्रश्न निर्माण झाला होता. आतासारखे रस्ते, दळणवळण, वाहतुकीची साधने नव्हती. जिल्ह्यातल्या रस्त्यामधील पुलांची कामे इ.स.१९२० नंतर सुरू झाली. केसरी सारखी ब्राम्हणी वर्तमानपत्रेही फारशी येथे येत नव्हती. शिवाय रत्नागिरीचे सत्यशोधक साप्ताहिक इ.स. १८७१ मध्ये सुरू झाले तर पुण्याचे केसरी त्यानंतर १० वर्षांनी म्हणजे इ.स. १८८१ मध्ये सुरू झाले.

**रत्नागिरी शहरातील मुद्रण कलेचा इतिहास व विकास:**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना रत्नागिरी शहरातील एकूण १३ मुद्रणालयांकडून प्रश्नावलीच्या माध्यमाद्वारे माहिती जमा करण्यात आली. परंतु सदर लेखामध्ये प्रस्तुत १३ मुद्रणालयां विषयी चर्चा न करता रत्नागिरी शहरातील मुद्रण कलेचा इतिहास व विकास या मुद्द्यावंर भर देण्यात आला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील रस्त्यावरील पुलांची कामे इ.स. १९२० नंतर सुरू झाली. त्यामुळे दळणवळण, वाहतूक इत्यादी सुधारणा झाली. त्यामुळे मुद्रणालयांसाठी लागणाऱ्या सोयीसुविधा जमा करणे शक्य होवू लागले, या सुधारणेच्या काळात रत्नागिरी शहरातील कै. हरी नारायण लिमये (सन १८४२ ते १९०६) नामक एका गृहस्थांनी सन १८७१ मध्ये 'सत्यशोधक' हे वर्तमानपत्र सुरू केले. त्यांनी नोव्हेंबर १८७१ मध्ये 'सत्यशोधक' साप्ताहिकाची पूर्नबांधणी केली. हे सत्यशोधक' साप्ताहिक १८७१ मध्ये सुरू झाले तर पुण्याचा 'केसरी' त्यानंतर १० वर्षांनी म्हणजे १८८१ मध्ये सुरू झाला. म्हणजेच रत्नागिरी शहाराला साहित्याचा वारसा हा पुण्यापेक्षा आधी लाभला असल्याचे लक्षात येते. संस्थापक कै. हरी नारायण लिमये हे शाळेमध्ये शिक्षक होते.

शिक्षकी पेशा हा त्याकाळी अत्यंत उदात्त मनाच्या माणसाने निर्मल वृत्तीनेच हे वर्तमानपत्र काढले ही गोष्ट उघडच आहे. कै. कृष्णशेट बाळशेट कापडी यांच्या बाजारच्या मुख्य तिठ्यावरील बंगल्यात 'सत्यशोधक' मुद्रण यंत्राची व 'सत्यशोधक' वर्तमानपत्राची स्थापना केली. रत्नागिरीत सन १८५७ पासून कै. जनार्दन हरी आठल्ये यांचे ''जगन्मित्र'' वर्तमानपत्र निघत होते. परंतु ते ४ वर्षांनंतर बंद पडले. त्यानंतर ''मदतनीस'' नावाचे एक वर्तमान निघाले होते. तेही २—३ वर्षांनी बंद पडले. सन १८८४ दरम्यान ''निबंधचंद्रिका'' नावाचे एक मासिकीही निघत होते. सत्यशोधकने १८८९ मध्ये टायपिंग प्रेस आणला त्याआधी शिळाप्रेस होता. कै. हरी नारायण लिमये यांचे पुत्र कै. दत्तात्रय हरी लिमये (बी.ए.एल.एल.बी.) (१८९२ ते १९४६) हे सत्यशोधकचे इ.स. १९२० ते १९३६ अशी १६ वर्षे संपादक होते. मध्यंतरी दि. ८ जानेवारी १९२८ ते २८ सप्टेंबर १९३० या काळात कै. नारायण विष्णू शितुत (बी.ए.एल.एल.बी.) हे संपादक होते.

इ. स. १९२० ते १९३६ या काळातले संपादक कै. दत्तात्रय हरी लिमये हे पेशाने वकील होते. घडणाऱ्या घटनांची दखल घेऊन त्यावर योग्य भाष्य करण्याची त्यांची क्षमता होती. त्यांच्या संपादनाच्या

काळातच १९२४ ते १९३७ या काळात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर रत्नागिरीत स्थानबध्द होते. त्यांना राजकारण करण्यास बंदी होती म्हणून त्यांची ध्येयधोरणे कै. लिमये यांनी उचलून धरली. इ. स. १९३६ मध्ये कै. दत्तात्रय लिमये यांनी आपले संपादक पद सोडले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इ. स. १९३७ मध्ये रत्नागिरी सोडली आणि मग सत्यशोधक मध्ये अडचणी निर्माण होऊ लागल्या.

त्यानंतर कै. विष्णू माधव लिमये म्हणजे बाळासाहेब लिमये हे सत्यशोधकचे संपादक झाले. ते विशेष शिकलेले नव्हते त्यामुळे त्यांच्या लिखाणात तफावत जाणवत होती. १९३७ मध्ये रत्नागिरीत ''बळवंत'' हे साप्ताहिक कॉंग्रेस पुढारी व गांधीवादी नेते कै. मोरेश्वर दिनकर जोशी (बी.ए.एल.एल.बी.) यांच्या संपादकाखाली काढण्यात आले. त्यातील मजकुर लोकांच्या ह्दयाला भावणारा असे व रत्नागिरीकर हे मुळचेच शांत प्रवृत्तीचे असल्याने त्यांना सर्वसमावेशक ''बळवंत'' साप्ताहिक हे आपलेसे वाटू लागले होते. त्यामुळे सत्यशोधक हे पिछाडीवर पडले.

इ.स. १९४८ मध्ये एस.टी. बससेवा सुरू झाली. मुंबईच्या लोकमान्य, लोकसत्ता, नवशक्ती, मराठा, सकाळ, नवाकाळ अशा मातब्बर दैनिकांची कोकणात आवक होऊन घरोघर ही वर्तमानपत्रे वाचली जावू लागली. सत्यशोधक केवळ आता नावापुरतेच उरले होते. १९७१ मध्ये त्याने कशीतरी शंभरी ओलांडली. ''बळवंत'', ''समानता'' इत्यादी स्थानिक साप्ताहिकांचीही सत्यशोधक सारखीच अवस्था झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत इ.स. १९५६ मध्ये मोरोपंतांनी ''बळवंत'' या साप्ताहिकाचे संपादक पद सोडले आणि ''समानता'' साप्ताहिकालाही कै. शिखरे गुरूजींसारखे कोणी संपादक राहिलेच नव्हते. त्यातच वर्तमानपत्र व्यवसायात मुंबईहून रत्नागिरीस आलेल्या कै. भिकाजीराव पालांडे या गृहस्थानी मोठ्या धाडसाने ''रत्नभूमि'' हे दैनिक सुरू केले तर १९८० पासून रत्नागिरी निवासी शांताराम घोसाळकर यांनी ''रत्नागिरी टाइम्स्'' हे दैनिक सुरू केले व ते यशस्वी ठरले.

**निष्कर्ष:**

मुद्रणकला आणि मुद्रणालयांचा उगम व विकास हा ग्रंथालयक्षेत्राशी संबंधित महत्त्वाचा विषय आहे. मुद्रणालयांचा जसा विकास होत गेला तसतसे छापील साहित्याचे स्वरूप बदलत जाते, छापील स्वरूपातील साहित्य हे नेहमी समाज प्रबोधनाचे काम करत असतात. प्रस्तुत लेखात रत्नागिरी शहरातील मुद्रणालये व त्यांचा विकास यावर अभ्यास करण्यांत आला आहे. अगदी पुण्याचे ''केसरी'' हे वर्तमानपत्र सुरू होण्यापूर्वी म्हणजे इ. स. १८८१ पूर्वी ''सत्यशोधक'' हे साप्ताहिक सुरू झाल्याचे दिसून येते आणि त्यामुळेच रत्नागिरी शहरात साहित्य क्षेत्रातील स्थित्यंतरे होत गेली आणि साहित्यक्षेत्रात कोकणातील रत्नागिरी शहराचे नाव मोठे झाले.

**संदर्भ ग्रंथ:**

- जोशी, महादेव शास्त्री. कोकण. भारतीय संस्कृतिकोश. (खंड २) १९७२. पृ. ५५० ते ५५३

- जोशी, महादेव शास्त्री. मुद्रणकला. भारतीय संस्कृतिकोश. (खंड ७) १९७२. पृ. ४२३ ते ४३०
- टिकेकर, गणेश रामचंद्र. मुद्रणसेवक. नोव्हेंबर १९२६. पृ. १०
- दाते, शंकर रामचंद्र. मुद्रण प्रवेश. पुणे : अ. वि. गृह प्रकाशन १९३७. पृ.क्र.५ ते १२
- मडगांवकर, गो. ना. मुंबईचे वर्णन १८६३ पृ. क्र. २४६ ते २४८
- मसुरकर, राजेंद्रप्रसाद सखाराम. पत्रकारिता. रत्नागिरी : यशोदा प्रकाशन, २००१.
- लिमये, अनंत हरी. ग्रंथ व्यवहार. पुणे : व्हिनस बुक स्टॉल, पृ. ३५ ते ४१.
- लेले, रा. के. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९८४.